(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. X / Issue – III ISSN 2277-8063

# मराठी स्त्रिगीतातील शंभू महादेव

**मोहिते सुदर्शना मानसिंग** संशोधक विद्यार्थिनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर मो. नं. 8007137882

## प्रास्ताविक

लोकसाहित्यात मराठी लोकगीतांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. लोकसाहित्याचा बराचसा भाग लोकगीतांनी व्यापला आहे. लोकगीते ही मौखीक परंपरेने चालत आलेली असतात. लोकगीतांना शतकांची परंपरा आहे. लोकगीतांचा कर्ता अनामिक असतो. लोकगीतांना काळाचे बंधन नसते. काळाच्या ओघाबरोबर मौखीक परंपरेने ती एका पीढीकडून दुसऱ्या पीढीकडे जात राहतात. लोकगीतात आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टिनी विविधता आहे. लोकगीताचे स्वरूप, गायक, विधी, उत्सव आणि आशयानुरूप लोकगीतांचे वर्गीकरण केलेल दिसून येते. लहान मुलांची गीते, स्त्रियांची लोकगीते, पुरुषांची लोकगीते अशा स्वरुपात ही लोकगीते विभागलेली दिसतात.

लोकगीतांचा बराचसा भाग स्त्रियांच्या लोकगीतांनी व्यापला आहे. मराठी लोकसाहित्यातील शंभू महादेवाची स्त्रिगीते हा अनमोल खजिना आहे. स्त्रिगीतांत शिखर शिंगणापूरचा शंभू महादेव या तीर्थक्षेत्राचे व क्षेत्राधिष्ठित्याचे वर्णन जागोजागी आलेले आहे. शंभू महादेवाच्या स्त्रिगीताचे श्रमगीते, विधीगीते, कावडीची गीते, तीर्थक्षेत्र वर्णनपर गीते असे ढोबळमानाने वर्गीकरण करता येईल.

प्रस्तुत शोधनिबंधात मराठी स्त्रिगीतातील शंभू महादेवाचे स्थान महात्म्य व आगमन, पूजा विधीचे स्वरूप, शंभू महादेवाचा चैत्री यात्रा उत्सव कावड परंपरा व मुंगी घाट कावड सोहळा इ. चे स्त्रिगीतात चित्रण कसे झाले आहे. ते मांडण्याचा प्रयत्न केला आहे.
शिखर शिंगणापूरचा शंभू महादेव हा भोसले घराण्याचा कुलस्वामी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांसह महाराष्ट्रातील अनेक घराण्यांचे श्री शंभू महादेव कुलदैवत आहे. भक्तांचे श्रद्धास्थान असलेला शंभू महादेव हा लोकदेव आहे. या लोकदेवाचा महिमा स्त्रिगीतात स्त्रियांनी मोठ्या श्रद्धेने, भक्तीभावाने, प्रेमाने, आनंदाने आळवलेला आहे. बेल, दवणा, सोमवार दिनविशेषाचे वर्णनही स्त्रिगीतात आले आहे. याबाबत डॉ. रा. चिं. ढेरे म्हणतात " बेलाच्या हिरव्या रंगाने आणि दवण्याच्या सुगंधाने तर ही स्त्रीगीते रंगून परिमळून गेलेली आहेत. " [१] म्हणजेच स्त्रियांच्या स्त्रिगीतात शंभू महादेवाच्या आवडीच्या, बेल, दवणा यांचे वर्णन आहे. शंभू महादेव या तीर्थक्षेत्राचा व क्षेत्राधिष्ठात्याचा, कावडीचा, बळी मंदिराचा महिमाही मोठ्या श्रद्धेने आळवलेला आहे.

**शंभू महादेवाचे स्थान महात्म्य व आगमन -**

महाराष्ट्रात सह्याद्री पर्वतरांगेची महादेव डोंगररांग ही एक शाखा आहे. महादेव डोंगररांगेत श्रीक्षेत्र शिखर शिंगणापूर वसले आहे. श्रीक्षेत्र शिखर शिंगणापूर हे महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यात वसलेले एक गाव व श्री शंभू महादेवाचे तीर्थक्षेत्र आहे. सातारा, सोलापूर या दोन जिल्ह्यांच्या सीमेवर प्राचीन काळापासून श्री शंभू महादेवाचे मंदिर अस्तित्वात आहे. याविषयी गणेश सदाशिवशास्त्री लेले, त्र्यंबककर म्हणतात, “ हे स्थान दक्षिण कैलास म्हणविते चैत्र पौर्णिमेस दमनकाने (दवण्याने) पूजा करण्याचे येथे मोठे माहात्म्य आहे. दमनकाची उत्पत्ती विष्णूचे अंशापासून झाली, असे क्षेत्र माहात्म्याचे वर्णन आहे. येथील पर्वतास कोथलाचल अशी संज्ञा आहे. " [2] म्हणजेच शिखर शिंगणापूर हे तीर्थक्षेत्र कोथलगिरी पर्वतावर आहे. श्री शंभू महादेवाचे तीर्थक्षेत्र धार्मिकदृष्ट्या तर महत्त्वाचे आहेच परंतु छत्रपती शिवाजी महाराजांचे कुलदैवत असल्याने ऐतिहासिक व राजकिय दृष्ट्याही महत्त्वाचे आहे. ' हर हर महादेव ' ही मराठ्यांची लोकप्रिय युद्धगर्जना आहे. यादव राजा सिंघण, शहाजीराजे, छत्रपती शिवाजी राजे, शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी व विठोजी, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर छ. संभाजी, फलटणचे निंबाळकर सेनापती संताजी घोरपडे, सरदार त्रिंबकजी डेंगळे इ. ऐतिहासिक व्यक्तींचा या स्थानाशी संबंध आला होता.

श्री शंभू महादेवाच्या स्त्रिगीतांमध्ये श्री शंभू महादेवाच्या स्थानाचा उल्लेख कोथलगिरी, शिखर शिंगणापूर, केवळ शिंगणापूर असा आलेला आहे. क्वचितच कोथलाचल असेही या पर्वताचे नाव आलेले आहे. याबाबत डॉ. रा. चिं. ढेरे म्हणतात - “आजवर संकलित झालेल्या स्त्रिगीतात शंभू महादेवाच्या या स्थानाचा उल्लेख प्राधान्याने 'शिखर' किंवा ‘शंभूचे शिखर’ या नावाने केलेला आहे. शिखर शिंगणापूर अथवा नुसतेच शिंगणापूर असे ग्रामनामही अनेकदा वापरले आहे. " [3] म्हणजेच तीर्थक्षेत्राचे नाव ही शिखर शिंगणापूरचा शंभू महादेव असे लोकप्रिय आहे. मी शंभू महादेवाची संबंधित स्त्रिगीते गोळा करण्यासाठी श्री शंभू महादेव या तीर्थक्षेत्राच्या परिसरात फिरत असताना स्त्रियांनी आपल्या देवाचा अभ्यास होणार त्याच्या ओव्यांचा अभ्यास होणार म्हटल्यावर आपल्या जवळ असणारा ओव्यांचा अनमोल ठेवा एक गाठोडे सोडल्या प्रमाणे प्रेमाने व आनंदाने माझ्यासमोर व्यक्त केला काही स्त्रियांनी ओवी मला दिली परंतु आपले नाव व पत्ता सांगण्याबाबत साशंकता बाळगली. श्री शंभू महादेवाच्या स्थानाचे वर्णन आपल्या ओवीत करताना एक स्त्री म्हणते,

“ शंभू ही शंकराचं वं । स्थान माणदेशी वं
संभू महादेवाला वं । मान तेल्याभूत्याच्या कावडीचा वं
तेल्या भूत्या वं । भक्त मोठा आवडीचा वं ॥
मुंगी घाट चढूनी वं । धार घालतो लिंगाशी वं ॥ ” [४]

श्री शंभू महादेवाचे स्थान माणदेशी असल्याचे स्पष्ट चित्रण ओवीत झाले आहे. माणदेशामध्ये शिखर शिंगणापूर आहे . शिखर शिंगणापूरच्या शंभू महादेवाच्या मंदिराच्या खाली बळी मंदिर आहे. बळी (श्री अमृतेश्वर) मंदिराचे वर्णन ओवीत पुढीलप्रमाणे आले आहे.

“ शिखर व शिंगणापूर
खाली बळीचं वं बळीचं पटांगण
पुटीच्या ग बाळासाठी गिरिजा घेतिया लोटांगण ” ५

श्री शंभू महादेवाच्या मंदिरासमोर गिरिजाने घेतलेल्या लोटांगणाचे शिल्प आजही आपणास पहावयास मिळते श्री शंभू महादेव हा स्वयंभू आहे श्री शंभू महादेवाच्या स्वयंभू रूपाचे वर्णन करताना स्त्रीया म्हणतात,

“संभू ही शंकराचं रूप स्वयंभू पाहावयाचे
संभू शिंगणापूरी राहतो शिंगणापूरी
वाट पाहतो भक्ताची
संभू शिंगणापूरचा राजा
द्या दंडवत माझा संग ” ६

शिंगणापूरच्या स्वयंभू श्री शंभू महादेवाला भक्तांची आवड असल्याने तो भक्ताची वाट पाहतो असे चित्रण वरिल ओवीत आहे. श्री शंभू महादेवाच्या स्थानाविषयी डॉ. कृष्णा इंगोलेही म्हणतात, “ महाराष्ट्रात तर सर्वात प्राचीन मंदिरे शिवाची आहेत. त्यातील एक स्थान म्हणजे शिखर शिंगणापूरचा शंभू महादेव. सह्याद्री पर्वतात, माणदेशाच्या उत्तर बाजूस एका डोंगररांगेत हे शिवमंदिर आहे.” ७

म्हणजेच शिंगणापूरचे श्री शंभू महादेव मंदिर प्राचीन काळातिल आहे.
हा कोथल नामे गिरीवर | माणनदीच्या तिरावर
जेथे शंभूमहादेव शंकर । आनंदेशी राहिला ॥

असे या स्थानाचे वर्णन दासगणू महाराजांनी केले आहे. दासगणू महाराजांच्या वर्णनात कोथलगिरी पर्वतावर श्री शंभू महादेव राहिले आहेत असे स्पष्ट चित्रण झाले आहे. शंकर हिमालयातून कोथलगिरी पर्वतावर कसे आले ते सांगणारी एक सारीपाठ खेळाची कथा लोकमानसात मौखीक रूपात आहे. ती कथा अशी एके दिवशी शंकर पार्वती सारीपाटाचा खेळ खेळत होती. डावात जे कोणी हरेल त्यांनी आपले सर्वस्व त्याग करून वैराग्य पत्करायचे अशी अट होती. शंकर हरले त्यामुळे ते हिमालयाचा त्याग करून कोथल गिरीपर्वतावर एकांत ठिकाणी येऊन तपश्चर्येला बसले. पार्वतीला विरह सहन होईना म्हणून ती शंकराचा शोध घेत घेत भिल्लीणीचे रूप घेऊन कोथलगिरी पर्वताच्या परिसरात आली. हीच कथा स्त्रिगीतात चित्रित झाली आहे स्त्रिया हाच कथेचा आशय ओव्यात प्रकटताना म्हणतात,

“सोंगट्या डाव । आल्याती आठ नऊ ॥
महादेव सांगतो नको गिरजा रडी घेऊ ||
रुसला शंभूदेवा । डोंगरी घाली धूप ॥
गिरीजा नार शानी । घेती भिल्लीणीचे रूप ॥” ८

सोंगट्याच्या खेळात हरल्याने आपल्या सर्वस्वाचा त्याग करून कोथलगिरी पर्वतावर आल्याचे चित्रण ओवीत पुढीलप्रमाणे झाले आहे

“ कोथलगिरी शंकर रुसूइनी आले |
थंडगार डोंगरी तपश्चर्येला बसले ||
पार्वती प्रकटली भिल्लाईणीच्या रूपात ।
तपश्चर्या मोडइली रमइली तांडव नृत्यात ॥" ९

रूसून आपले सर्वस्व त्याग करून आलेल्या शंकरास पार्वतीने भिल्लीणीचे रूप घेऊन खूप खूप शोधले. कोथलिगिरी पर्वताच्या परिसरात पार्वतीने पंचलिंगाची स्थापना करून शंकराची उपासना केली. पार्वतीच्या पूजेने प्रसन्न होऊन शंकरांनी तीला आठ ठिकाणी दर्शन दिले. दर्शन दिलेली आठ ठिकाणे म्हणजेच स्वयंभू अष्टलिंगे होत. या अष्टलिंगाच्या दर्शनाने पृथ्वी प्रदक्षिणेचे पुण्य मिळते अशी लोकांची श्रध्दा आहे.

**श्री शंभू महादेवाचा पूजाविधी-**

प्राचीन काळापासून परंपरेने श्री शंभू महादेवाचे सेवेकरी शंभू महादेवाची प्रातःकाळी, मध्यान्हकाळी, सायंकाळी प्रदोष पूजा व शेजारती करतात. शेजारती नंतर मंदिराचा दरवाजा बंद होतो. पहाटे प्रात:काळी श्री शंभू महादेवाची पूजा करताना शंभू हर हर महादेवची गर्जना भक्त व सेवेकरी करतात. त्याचे वर्णन आपल्या ओवीत करताना स्त्रीया म्हणतात,

“ सकाळच्या पारी कोण करे हरहर

त्याला देवाचा छंद भारी ''[१०]

श्री शंभू महादेवच्या पूजेसाठी बेल, दवणा,भस्म हळद, कुंकू, चंदन, अक्षता, तुलशीपत्र धोत्र्याची फुल , इ. वस्तूंचा केला जातो. सुर्योदय झाल्यानंतर सूर्यनारायणाचे दर्शन घेतले जाते . त्याचवेळी शंभू महादेवाची पूजा करित असताना धोतऱ्याचे फुल वाहिले जाते. हेच स्त्रिया आपल्या ओवीत म्हणतात,

" उगवले नारायण
डोळा भरून पाहिले
शंभू महादेव गिरिजा
फुल धोतऱ्याचे वाहिले ''[११]

शंभू महादेवाची आपल्यावर कृपादृष्टी व्हावी म्हणून शंभू महादेवास त्याच्या आवडत्या वस्तू (बेल, दवणा, भस्म,धोतऱ्याचे फुल इ.) पिंडीवर वाहण्याची प्रथा रूढीपरंपरेने चालत आली आहे. शंभू महादेवाची पूजा करित असलेली स्त्री म्हणते,

शिवा शिवा तु रे महादेवा
शंकराची मी करते सेवा ॥धृ ॥
शंभू महादेवाच्या पूजेला पानपूल
शंकराला वाहते बेल ॥१॥
शंभू महादेवाच्या पूजेला दवना वाहती
दर्शन करून झाले स्वार्थी ॥ २ ॥ ,
शंभू महादेवाच्या पूजेला दहिभात
दर्शन करून जोडीला हात ॥३॥
शंभू महादेवाच्या पूजेला पंचारती
आरती करोनी मिळाली मुक्ती ॥५॥ [१२]

शंभू महादेवाच्या पिंडीवर बेल दवणा वाहुन भक्त पूजा करतात तसेच दहिभात लिंपनाची देखील पूजा केली जाते. शेपटी आरती होते. याचे चित्रण वरील लोकगीतात आहे. सोमवार या दिनविशेषाच्या निमित्ताने शंभू महादेवाची विशेष पूजा होते. प्रदोष व्रताच्या निमित्ताने शंभू महादेवाची पूजा व अभिषेक करतात. याबाबत संत तुकाराम महाराज आपल्या अभंगातून म्हणतात,

आज सोमवार दिवस करू शंभूचा प्रदोष
दह्या दुधाच्या कावडी अभिषेक शंभावरी
बेलपत्रिका तांदूळ दोन्ही आण्याबरोबरी
दह्या दुधाच्या कावडी अभिषेक शंभावरी
तुका म्हणे शंभू भक्त त्यांचे राहणे कैलासात
दह्या दुधाच्या कावडी अभिषेक शंभावरी

वरील अभंगात शंभू महादेवाची भक्त मोठ्या भक्तिभावाने पूजा करतात, प्रदोष व्रत करतात, अभिषेक करतात असे वर्णन आले आहे. महादेवाचे प्रदोष व्रत करणे हे धार्मिक लोकतत्त्व परंपरेने लोक माणसात रूढ आहे . शंभू महादेवाच्या पूजाविधीतूनही धार्मिक लोकतत्त्वीय अविष्काराचे दर्शन घडते. सोमवार हा शंभू महादेवाचा वार आहे असे लोक समजतात. आठवडयातील दर सोमवारी भक्त उपवास करतात. श्रावण महिन्यातील सोमवारी शंभू महादेवाची विशेष पूजा असते. श्रद्धेने शिवमुठ वाहिली जाते. सोमवारचे व्रत सर्व व्रतात मोठे असते. सोमवार व्रताचा महिमा आपल्या ओवीत सांगताना स्त्रीया म्हणतात,

"सोमवार दिवस सर्व व्रतामध्ये थोर
शंभू महादेवाच्या पिंडीवर बेल दवण्याची धार" [१३]

सोमवारी शंभू महादेवाचा उपवास म्हणून स्त्रीया घराची साफसफाई करून सडा-सारवण करतात. सोमवारी घर सारवणारी स्त्री म्हणते ,

" आठवड्या सोमवारी सारवते चारी कोन
बळी माझ्या महादेवाचं रमलंय शंकराचं मन
आठवड्या सोमवारी सारवते उंबरठा
बळी माझ्या महादेवाचा मला शंभूचा पुरवठा "[१४]

भारतीय संस्कृतीतील शुभप्रसंगी घर व अंगण गाईच्या शेणाने सारवण्याच्या प्रथेचे चित्रण वरील ओवीत आहे. सोमवारी घर स्वच्छ ठेवल्यास, घर सारवल्यास माझ्या घरी शंकराचं मन रमेल असे ती श्रद्धेने म्हणत आहे. अलौकिक पातळीवरून लैकिक पातळीवर आणून स्त्रीया शंभू महादेवाचे वर्णन करतात, सारवणे खूप कष्टाचे काम आहे. वाकून सारवत असताना कमरेला पाठीला रग लागते. तरीही ती सारवण्याचे काम करते . सारवण्यासाठी आवश्यक शेण , माती, पाणी इ. गोष्टींचा पुरवठा बळी करत आहे असे चित्रण वरील ओवीत आहे.

**श्री शंभू महादेवाचा यात्रा उत्सव**

हिमालयातून शंकर रुसुन कोथलगिरी पर्वताच्या परिसरात आल्यावर पार्वती त्यांना शोधत शोधत भिल्लीणीच्या वेषात आली. सर्व देवीदेवतांनी शंकर व पार्वती एक व्हावेत म्हणून प्रयत्न केले. कोथलगिरी पर्वतावर सर्व देवीदेवतांच्या समक्ष शंकर व पार्वती यांचे दुसऱ्यांदा लग्न लावून दिले अशी एक पौराणिक आख्यायिक आहे. प्राचीन काळापासून परंपरेने शिखर शिंगणापूरी दरवर्षी शंभू महादेव व पार्वती यांचा विवाहसोहळा परंपरेने पार पडतो. विवाह सोहळयाच्या निमित्ताने चैत्री यात्रा भरते. चैत्र शुद्ध एक (प्रतिपदा) म्हणजेच गुढीपाडवा या दिवशी श्री शंभू महादेवाच्या लग्नाची मुहुर्तमेढ रूढी परंपरेने रोवली जाते. परंपरेने घाणा भरला जातो. स्त्रीया घाणागीते म्हणतात घाणागीतातून भारतीय संस्कृतीतील विवाह सोहळयाचे चित्रण झाले आहे शंभू महादेवाच्या लग्नाचा घाणा भरित असताना स्त्रीया आनंदाने व उस्फूर्तपणे म्हणतात,

"घाणा भरियेला | सव्वा खंडी सव्वा मण |
लग्ना आले गजानन | शंभूरायाच्या ॥
आधी मुळ चिठ्ठी | धाडावी गणराया ॥
लग्नाला या हो या या | शंभूरायाच्या ||
सासू सासऱ्याच्या || पहिल्या कान्ताच्या ॥
बोलवा सातपाच । सुवासिनी ॥
गौरीबा साजणी | नवरी होई आता ॥
भोळा सांब आला बाई | नंदीवरी तिचा भार्ता ॥
वैकुंठीचे शंभू आले | महादेव लग्नापायी ॥
लक्ष्मी घाणाभरी | मंगल गीत गाई ॥ " [१५]

वरील स्त्रिगीतात शंभू महादेवाच्या लग्नाचा घाणा भरण्याचे वर्णन आहे घाणा भरण्यासाठी पाच किंवा सात सुवासिनी बोलवा असे स्त्रीया म्हणतात लक्ष्मीदेवी शंभू महादेवाचा घाणा भरीत आहे व मंगलगीत गात आहे असेही वर्णन वरील घाणागीतामध्ये आले आहे. भारतीय संस्कृतीतील विवाह सोहळयातील घाणा भरणे हे परंपरेने आलेले सांस्कृतिक लोकतत्त्व वरील घाणागीतात आले आहे. भारतीय संस्कृतीतील विवाह सोहळयातील सांस्कृतिक अविष्कार यातून प्रकट होतो.

चैत्र शुद्ध पंचमीला शंभू महादेवाचा हळदी समारंभ असतो. चैत्र शुदध अष्टमी या दिवशी श्री शंभू महादेव मंदिराचा कळस व श्री अमृतेश्वर (बळी ) मंदिराचा कळस यांना धज बांधली जाते. चैत्र शुद्ध अष्टमीला साधारणत: चार वाजता या कार्यक्रमास प्रारंभ होतो. धज बांधण्याचा मान परंपरेने कोळ्यांना आहे. धजेचे एक टोक श्री शंभू महादेव मंदिराचा कळस व दुसरे टोक श्री अमृतेश्वर (बळी) मंदिराचा कळस यांना बांधले जाते. धज बांधण्याचा हा अपूर्व विधीसोहळा पाहण्यासारखा असतो. श्री शंभू महादेवाच्या कळसास धजेचे एक टोक बांधून धज शिखरावरून वेशीकडे टाकला जातो. तिथे असणारे लोक हा धज झेलत झेलत पुढच्या मंडळी कडे टाकतात आणि शेवटी श्री अमृतेश्वर (बळी ) मंदिराच्या शिखरास दुसरे धजेचे दुसरे टोक बांधले जाते. दोन्ही मंदिराच्या शिखरांना एकाच लांबलचक पागोटयाची दोन टोके बांधण्याचा हा विधी सोहळा पाहण्यासाठी लोक मोठ्या प्रमाणात जमतात धज पौर्णिमेला उतरवितात. सायंकाळी उतरविल्यानंतर महापूजा व शेजारती होते. मग मंदिराचा दरवाजा बंद होतो .

धज वर्षभरात केवळ आठवड्यातील दर सोमवारी व्रतस्थ राहून सोवळयात अडिच हात विणतात वर्षभरात पाचशे फुटाचे पागोटे विणुन चैत्री यात्रेच्या वेळेस शंभू महादेवाच्या शिखरावरती पायी दिंडीच्या माध्यमातून वाजत गाजत आणले जाते. मानाची धज विणण्याचे चित्रण आपल्या स्त्रीगीतात करताना स्त्रीया म्हणतात,

"आठवड्याच्या सोमवारी मुमीन बसला मागाला,
एफ मुंडास दोघाला ।
बळी महादेवाला "[१६]
(किंवा बळी माझ्या महादेवाला एक मुंडास दोघाला )

धज विणण्याचा मान मराठवाड्याला परंपरेने आहे धज विणण्याचा मान ज्या कुटुंबाला मिळतो ते कुटुंब स्वतःला धन्य समजते. " याविषयी चित्रकार श्री डी. डी. रेगे यांनी हे विणकर साळी घराणे आवसगाव व खांबसवाडी या गावातील असल्याचे म्हटले आहे. " [१७] म्हणजेच आवसगाव व खांबसवाडीला धज विणण्याचा मान परंपरेने आहे.

याविषयी डॉ रा. चिं. ढेरे ही म्हणतात, "श्री रेगे यांनी या मानकरी विणकर घराण्याची नेमकी नावे नोंदली असल्यामुळे ते घराणे मराठवाड्यातीलच आहे असे दिसते. " [१८] यावरून असे स्पष्ट होते की शंभू महादेव व श्री अमृतेश्वर (बळी मंदिर) यांना बांधली जाणारी मानाची धज मराठवाड्यातील आवसगाव व खांबसवाडी येथून परंपरेने शिखर शिंगणापूर येथे येते. मराठवाडयातून शंभू महादेवाच्या लग्नासाठी वऱ्हाड येते. वर्षभर विणलेली धज मराठवाडयातून शिंगणापूर येथे पायी दिंडीने वाजत गाजत आणली जाते. ही धज शंभूमहादेवाच्या लग्नाचा मानाचा आहेर आहे असे लोक समजतात. धज बांधणे हा एक यात्रेचा असाधारण विशेष आहे.

चैत्र शुद्ध अष्टमीला रात्री दहा वाजता शंभू महादेव विवाहसोहळयास प्रारंभ होतो. सुरुवातीला बळी मंदिरात व नंतर शिखरावरती शंभू महादेव व पार्वती यांचा विवाह सोहळा वादयांच्या गजरात मंगलअष्टकाच्या सुरात पार पडतो. पिपाणी, सनई, चौघडे, हलगीच्या गजरात पार पडणाऱ्या शंभू महादेवाच्या विवाह सोहळयाचे वर्णन करताना स्त्रीया म्हणतात,

"चैत्र मास उन्हाळयात
काय वाजत गाजत
अंबाल्या बारशीला लगीन
लगीन शंभूचं लागते " [१९]

चैत्र महिन्यात अष्टमीला हा विवाहसोहळा पार पडतो. महादेव डोंगरावरती असंख्य भाविक जमतात मंगल अष्टकांच्या मंगल सुरात होणाऱ्या विवाहसोहळ्याचे वर्णन ओवीत करताना स्त्रीया म्हणतात,

"आरण्या डोंगरात वाजते शंकासुरी
झाली गिरिजा नवरी " [२०]

वरिल ओवीतून भारतीय संस्कृतीतील विवाह साहेळयाचे चित्रण झाले आहे विवाह सोहळा साजरा करणे हा भारतीय संस्कृतीतील एक सांस्कृतिक लोकतत्त्वीय अविष्कार आहे. याचे चित्रण वरील ओवीतून स्पष्टपणे झाले आहे .

**कावड परंपरा व मुंगी घाट कावड सोहळा**

शंभू महादेवाच्या यात्रेच्या निमित्ताने रूढी परंपरेने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातुन काठया व कावडी येतात. कावडीच्या रांजणात गंगेचे पाणी आणून पिंडीवर कावड नाचवत पाणी सांडतात याला 'धार' घालणे म्हणतात. शंभू महादेवाची आवडती गंगा त्याला भेटवणे ही त्यामागची लोकांची श्रद्धा असते .

" वाहे शंभूची कावडी | पुण्य अवघे सावडी ।
चैत्रमासी शिखराचल | वाहे दवणा गंगाजळ ॥

असे मध्वमुनीचेही या संबंधी वर्णन आढळते. कावडीचे वर्णन करताना स्त्रीया आपल्या ओवीत म्हणतात,

" महादेवाच्या वाटेनं
काठ्या कावड्यांचा भार
देवा माझ्या महादेवाचा .
शिंगणापूरी जयजयकार " [२१]

शंभू महादेवाला धार घालण्यासाठी शिंगणापूरात परंपरेने असंख्य कावडी येतात त्यांपैकी प्रथम मानाची कावड तेल्या भूत्याची आहे. मुंगी घाट चढून वादयाच्या गजरात दोराशिवाय मानवी साखळीच्या साहाय्याने, द्राविडी प्राणायम करित पैलवान कावड डोंगरमाथ्यावर आणतात याचे वर्णन ओवीत करताना स्त्रीया म्हणतात,

"तेल्या भूत्याची कावड मुंगी घाटा आली घाया ।
पैलवानांनी दिल्या बाह्या |" [२२]

मुंगी घाटातून तेल्या भूत्याची कावड वरती चढत असताना असंख्य लोक हा सोहळा पाहतात याचे वर्णन स्त्रीया आपल्या ओवीत करताना म्हणतात ,

" नवसाकारण कावड चढती वरती संभाची
मानकरी पुढं चालती, मागं गाडी त्यांची
मुंगी घाटानं कावड चढती तेल्या भूत्याची
जन जतरा पाहती तमाशा, गर्दी वाद्यांची " [२३]

तीन ते चार तास चालणारा मुंगाघाटातील तेल्या भूतोजी बुवांच्या कावडीचा व इतर कावडीचा हा अपूर्व सोहळा भक्त मोठ्या उत्सूकतेने पाहतात. मुंगी घाटातून सर्वात शेवटी वरती चढणारी भुतोजी बुवांची कावड आहे. कावड शिखरावरती गेल्यानंतर फटाक्यांची आतषबाजी होते. लोक कावडीला नवस बोलतात, कोणी नवस फेडते. त्यानंतर तेल्या भुत्याच्या कावडीच्या कलशात ( रांजणात) निरा नदीच्या आणलेल्या जलाने प्रथम बळीस व नंतर शंभु महादेवास 'धार' घातली जाते .

शंभू महादेव नवसाला पावतो अशी त्यांची ख्याती आहे. वांझोटेपणाच्या आरोपातून सुटका करून घेण्यासाठी , पुत्रप्राप्तीसाठी स्त्रीया नवस बोलतात. नवसाचे स्त्रियांच्या ओवीत चित्रण करताना स्त्रीया म्हणतात,

"निक्का नवस करून गेलो
नवसा सारखं माझ्या झालं
महादेवाच्या दिंडीतून बाळ माझ्या दिंडीत आलं " [२४]

स्त्रीया आपल्या सुखी संसारासाठी शंभू महादेवाकडे नवस बोलतात त्याचप्रमाणे राजेमहाराजे ही शंभूमहादेवाला नवस बोललात राजे यांनी शंभूमहादेवाकडे नवस बोलल्याचे चित्रण स्त्रियांच्या ओवीत आहे. त्या म्हणतात.

" महादेवाच्या पिंडीवर | बेल वाहिला शिळाताजा
पुत्र मागुनी बेला राजा ॥ " [२५]

भोसले घराण्याचे कुलदैवत शिखर शिंगणापूरचा शंभू महादेव असल्याने वरील ओवीत शहाजीराजेचे वर्णन असावे. एखादया देवाच्या वा साधुपुरुषांच्या कृपाप्रसादाने मुलगा झाल्यावर त्याची नावे ठेवण्याची प्रथा भोसले घरण्यात होती (उदा. शहाजी,

शरीफजी) शंभू महादेवाच्या कृपेने जिजामातेला पुत्र झाल्यावर त्याचे नाव शिवा असे ठेवले असावे. पुढे त्यास आदरार्थी जी हा प्रत्यय लागुन शिवाजी झाले असावे. याविषयी डॉ. कृष्णा इंगोलेही म्हणतात "या ओवीचा संबंध छ. शहाजी महाराजांशी उद्देशून असावा. लोकगीतातील एखादी ओवी इतिहासावर असा प्रकाश टाकू शकते इतिहास तज्ज्ञानी याचा शोध घ्यायला हवा." [26] म्हणजे याचा अर्थ स्पष्ट होतो की, लोकगीतात अशाप्रकारे इतिहासाचा सूक्ष्मतम धागा असू शकतो. मौखीक दंतकथेतूनही शिवाजी महाराज हे शंभू महादेवाचा अवतार होते असे वर्णन आले आहे. तेही शंभू महादेवाचे भक्त होते. शिखर शिंगणापूरी शंभू महादेवाच्या दर्शनास येत असत. पिंडीवरल्यासारखे अर्धचंद्राकार कपाळी गंध लावत असत. हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीचे श्रेयही शिवाजी महाराजांनी शंभू महादेवास विश्वासाने. श्रद्धेने,भक्तीने दिले आहे.

**निष्कर्ष -**

१) शंभू महादेवाचे स्थान सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यात शिखर शिंगणापूर येथे आहे.
२) शंभू महादेवाच्या लोकगीतांची भाषा, साधी, सोपी, ओघवती व प्रवाही आहे
३) शंभू महादेव भोसले घराण्यांचे कुलदैवत असल्याने ऐतिहासिक व राजकीय दृष्ट्याही महत्त्वाचे स्थान आहे
४) शंभू महादेवाच्या लोकगीतात धार्मिक, सामाजिक, सांस्कृतीक व अध्यात्मीक लोकतत्त्वांचे दर्शन घडते
५) शंभू महादेवाच्या लोकगीतातून भारतीय संस्कृतीचे चित्रण झालेले आहे.
६) शंभू महादेवाच्या चैत्री यात्राउत्सवाचा धज बांधणे व मुंगी घाटातून तेल्या भूत्याची कावड वरती नेणे हा असाधारण विशेष आहे.

**संदर्भ सूची -**

१) रा चिं. ढेरे, "शिखर शिंगणापूरचा शंभू महादेव", श्री विद्या प्रकाशन प्रथमावृत्ती, ^पृष्ठ ३
२) गणेश स. लेले,त्रंबककर ,"तीर्थयात्राप्रबंध" दुसरी आवृती पुणे १९६४ पृष्ठ. कृ. १३५
३) रा. चिं. ढेरे, उ. नि पृष्ठ क्र. 3
४) संकलित (राजाबाई धोंडिबा मोहिते स्थळ : लोंढे मोहिते वाडी)
५) संकलित (कलावती गेना ननवरे स्थळ : मठाचीवाडी फडतरी
६) संकलित (कमल शामराव जाधव स्थळ : बारामती )
७) कृष्णा इंगोले, "लोकसंस्कृतीतील स्त्रीरूपे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती पृष्ठ कृ. १६०
८) तत्रैव पृष्ठ. कृ. १६०
९) संकलित (पवार अविंदाबाई वसंत स्थळ : लोंढेमोहिते वाडी)
१०) संकलित (मालन गेना ननवरे स्थळ : माळेवाडी (फडतरी )
११) संकलित (सोनाबाई जगन्नाथ मोहिते स्थळ : लोंढेमोहिते वाडी)
१२) संकलित(वत्सलाबाई गणपतगिरी, रेणापूर जि. लातूर स्थळ शंभू महादेव मंदिर परिसर
१३) संकलित ( नीलाबाई विष्णू बोधले मु.पो. लोणंद )
१४) संकलित (वत्सलाबाई गणपतगिरी उ. नि. )
१५) कै. यशवंत बळवंत बडवे, 'शंभू महादेव' हिंदुस्थान प्रकाशन संस्था प्रथमावृत्ती २०१६ पृष्ठ कृ. ७१
१६) संकलित (वत्सलाबाई गणपनगिरी उ.नि.)
१७) संपा सरोजिनी बाबर , 'कुलदैवत', महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती, पुणे. १९७४ पृ.३३
१८) रा. चिं. ढेरे उ. नि, पृष्ठ. कृ. १४०
१९) संकलित (छगुबाई ढोले गाव -खेडसावरगाव स्थळ - शिखर शिंगणापुर शंभू महादेव मंदिर परिसर)
२०) संकलित (सुमनबाई वैजनाथ ढोले, गाव- थोट सावरगाव स्थळ - शिखर शिंगणापूर शंभू महादेव मंदिर परिसर)
२१) संकलित (संगिता बडवे मु.पो शिंगणापूर)
२२) संकलित (कमल शामराव जाधव बारामती)
२३) रा. चिं. ढेरे, उ. नि. पृष्ठ. कृ. १३
२४) संकलित (आक्काबाई शिवराम ओगटेकर गांव- कोथोली ता. पन्हाळा जि - कोल्हापूर.
स्थळ -शंभू महादेव मंदिर परिसर)
२५) कृष्णा इंगोले, उ.नि. पृष्ठ कृ. १६२
२६) तत्रैव पृष्ठ कृ. १६२